तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित,

# व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद


## मराठी विभाग वार्षिक अहवाल

## २०१९-२०२०

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये १२ फेब्रुवारी २०२० पर्यंत झालेल्या विविध उपक्रमांचा सचित्र अहवाल अवलोकनार्थ सादर करीत आहोत.

अ) सत्र पहिले :-

१. परिसंवाद :-



परिसंवादात 'उगवले नारायण' या कवितेवर चर्चा करताना विद्यार्थी



परिसंवादात 'प्रीती' या कवितेवर मंथन करताना निशा शेरखाने



परिसंवादात संवाद साधताना अश्विनी शेरखाने

दि.११ सप्टेबर २०१९ बी.ए.प्रथम वर्षाच्या वर्गावर परिसंवाद घेण्यात आला. या परिसंवादात कथात्म साहित्य या अभ्यास पत्रिकेतील निवडक कथांवर आधारीत चर्चा करण्यात आली. एकूण आठ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

२. भारतीय संस्कृती परीक्षा :-





दि.१४ सप्टेबर २०१९ रोजी विवेकानंद केंद्र कन्याकुमारी शाखा, धाराशिव व विभागाच्यावतीने भारतीय संस्कृती परीक्षा संपन्न झाली. या परीक्षेचे हे तिसरे वर्ष होते. एकूण २० विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

३. क्षेत्र भेट :-





आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांसोबत



शेतकऱ्यांच्या आत्महत्यासंदर्भात आयोजित केलेल्या क्षेत्रभेट उपक्रमांतर्गत एकूण तीन आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. या माध्यमातून आतमहत्येमागची कारणे, स्थानिक परिस्थिती आणि करावयाच्या उपाययोजना याबाबत माहिती संकलित करून संबंधित विभागास सादर करण्यात आली.

४. घटक चाचणी परीक्षा :-

सत्राखेर दि.३ ऑक्टोबर रोजी प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षातील विविध अभ्यास पत्रिकांच्या घटक चाचण्या घेण्यात आल्या. वर्गातील प्रत्यक्ष उपस्थिती कमी असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी सदरहू प्रश्नपत्रिकांची उत्तरे घरून सोडवून आणली होती. त्याचेही मूल्यमापन करण्यात आले.

५. विद्यार्थी-पालक संपर्क अभियान :-





विद्यार्थी-पालक अभियानांतर्गत प्रत्यक्ष पालक भेटी.



या सत्रात दि.०५ सप्टेंबर रोजी आमच्या पालकत्वात येणाऱ्या बी.ए.-प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांना संपर्क करून विद्यापीठ परीक्षा फॉर्म भरण्यासाठी प्रेरीत केले तर दि.९ ऑक्टोबर रोजी विद्यार्थ्यांना संपर्क करून विद्यापीठ परीक्षा देण्याची सूचना करण्यात आली.

ब) सत्र दुसरे :-

१) चर्चासत्रे/परिसंवाद :- प्रा.डॉ.सहदेव रसाळ यांनी खालील उपक्रमात सहभाग घेऊन योगदान दिले.

- द इंग्लिश एज्युकेशन सोसायटी, अंबाजोगाई वतीने मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटर, औरंगाबाद येथे आयोजित एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंधाचे वाचन. (दि.१४ डिसेंबर २०१९)
- तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर यांच्यावतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात 'पटकथा लेखन संकल्पना, स्वरुप, प्रकार आणि वैशिष्ट्ये' या विषयावरील शोधनिबंधाचे वाचन केले.
- गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगावच्या वतीने घेण्यात आलेल्या गांधी विचार संस्कार परीक्षेत द्वितीय क्रमांक मिळवून रौप्य पदक प्राप्त केले. (दि.१३ जानेवारी २०२०)



गांधी विचार परीक्षेत दुसरा क्रमांक प्राप्त केल्यानंतरच्या प्रसंगी

२) अखिल भारतीय साहित्य संमेलन सहभाग :-

९३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन उस्मानाबाद येथे दि.१०, ११ व १२ जानेवारी दरम्यान संपन्न झाले. संमेलनाच्या संयोजनात महाविद्यालयाने विविधांगी सहभाग दिला. महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या डॉ.अनार साळुंके व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ.अभय शहापूरकर यांनी संमेलनाच्या संयोजन समितीत सदस्य म्हणून बहुमोल कार्य केले. विभागप्रमुख तथा प्रभारी प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी यांची संमेलन स्मरणिका 'पोत' च्या संपादकीय मंडळात निवड झाली होती. तर डॉ.सहदेव रसाळ यांनी कविकट्टा या विभागात जबाबदारी पार पाडली. संमेलनातील 'पोत' या स्मरणिकेत डॉ.सहदेव रसाळ यांचा 'अण्णा भाऊ साठे : व्यक्ती आणि वाङ्मय' हा लेख प्रकाशित झाला. तसेच संमेलनात संपन्न झालेल्या अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर आधारीत परिसंवादात सूत्रसंचालन डॉ.प्रशांत चौधरी यांनी केले.

- ग्रंथ दिंडी :-

साहित्य संमेलनाच्या पहिल्या दिवशी निघालेल्या ग्रंथ दिंडीत महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. या ग्रंथ दिंडीत दोन प्रकारांचे देखावे तयार करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये साहित्य विषयक दृष्टिकोन विकसित व्हावा हा हेतू समोर ठेवून 'मराठीतील स्त्री-लेखिका' हा पहिला देखावा तयार करण्यात आला. यात एकूण २६ विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. मराठीतील बहिणाबाई चौधरी, ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले, मालतीबाई बेडेकर, शांता शेळके, दूर्गाबाई भागवत, अरुणा ढेरे इत्यादी लेखिकांसारखा पेहराव सहभागी विद्यार्थीनींनी केला होता व हातामध्ये संबंधित लेखिकेची साहित्यकृतीही विद्यार्थीनींनी घेतलेली होती. या देखाव्याच्या संयोजनात डॉ.मिलिंद माने यांचे सहकार्य लाभले. या दिंडीसाठी डॉ.प्रशांत चौधरी, डॉ.सहदेव रसाळ यांनी परिश्रम घेतले. या दिंडीत विद्यार्थी-विद्यार्थीनीं आणि शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.










९३ वे अ.भा.साहित्य संमेलन : लेखिकांच्या पेहरावातील विद्यार्थीनी
व ग्रंथदिंडीत सहभागी विद्यार्थी–शिक्षकवृंद

३) घटक चाचणी परीक्षा :-

या सत्राच्या शेवटी दि.३ फेब्रुवारी रोजी बी.ए.-प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांची घटक चाचणी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत विद्यार्थ्यांकडून अभ्यासक्रमावर आधारीत वेगवेगळ्या घटकाची परीक्षाभिमुख तयारी करून घेण्यात आली.

४) संगीत शारदा नाटक चित्रफित :-

दिनांक ७ फेब्रुवारी रोजी बी.ए.द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमाला अनुसरून संगीत शारदा या नाटकाची चित्रफित दाखवण्यात आली. या कार्यक्रमासाठी डॉ.विनोदकुमार वायचळ यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमास प्रा.डॉ.प्रशांत चौधरी, प्रा.डॉ.सहदेव रसाळ आणि विद्यार्थी-विद्यार्थीनी यांची उपस्थिती होती.

५) मूल्यवर्धित अभ्यासक्रम :-

दि.१२ फेब्रुवारी रोजी मराठी विभागाच्यावतीने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'मराठी भाषेचा व्यावहारिक अभ्यास' हा मूल्यवर्धित अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. या अभ्यासक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य तथा मराठी विभागप्रमुख डॉ.प्रशांत चौधरी, आयक्यूएसी प्रमुख डॉ.अर्चना झाडे, प्रा.डॉ.विनोदकु मार वायचळ आणि प्रा.डॉ.सहदेव रसाळ यांच्या उपस्थितीत पार पडले. या अभ्यासक्रमासाठी एकूण २६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.



मूल्यवर्धित अभ्यासक्रम प्रसंगी बोलताना डॉ.अर्चना झाडे मंचावर व मूल्यवर्धित अभ्यासक्रमात सहभगी विद्यार्थी.



६) विद्यार्थी–पालक संपर्क अभियान :-

या सत्रात दि.१० डिसेंबर रोजी आमच्या पालकत्वात येणाऱ्या बी.ए.प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या भेटी घेण्यात आल्या. यामध्ये काजळा, भंडारवाडी, कोळेवाडी या गावातील विद्यार्थी व पालक यांच्या भेटी घेऊन महाविद्यालयीन व कौटुंबिक विषयावर चर्चा करण्यात आली. या भेटी दरम्यान विद्यार्थी आणि पालक यांचा उत्तम सहयोग लाभला.

Rasal
डॉ. सहदेव रसाळ
सहाय्यक प्राध्यापक

प्राचार्य
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय
उस्मानाबाद ४१३५०१

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय
कार्यालय
उस्मानाबाद